# शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळ मर्या., नाशिक-२.

रजि. ऑफीस आदिवासी विकास भवन. २ रा मजला, रामगणेशगडकरी चौक, जुना आग्रा रोड, नाशिक - ४२२ ००२.

दुरध्वनी - ०२५३-२३१५८६०, फॅक्स - (०२५३) २३१५८६०

www.mahashabri.com mail-Shabarinsk@gmail.com


जा.क्र.शआविविम/प्रकल्प/प्रशा/ ५ /२०१६

नाशिक-२ दिनांक - ४/४/२०१६

## संक्षीप्त विशेष सुचना

शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळ मर्या., नाशिक यांचे आस्थापनेवरील निरिक्षक या पदाच्या भरती प्रक्रिया महाराष्ट्र शासन राजपत्र दिनांक ९ जुन, २०१४ चे अधिसुचनेनुसार गट-क मधील आदिवासी विकास निरिक्षक हे पद पुर्णत: स्थानिक अनुसूचित जमातीच्या उमेदवारांमधुन भरावयाचे आहे. त्यामुळे महामंडळातील निरिक्षकांची पदे पुर्णत: स्थानिक अनुसूचित जमातीच्या उमेदवारांमधुनच भरावयाची असल्याचे जाहिरातीत नमुद आहे.

निरिक्षक संवर्गातील भरावयाची पदे मा.राज्यपाल महोदय, महाराष्ट्र शासन यांचेकडील अधिसुचना दिनांक ९ जुन, २०१४ नुसार आवश्यक शैक्षणिक अर्हता असलेल्या स्थानिक अनुसूचित जमातीच्या उमेदवारांमधुनच भरावयाचे असल्याने त्यासाठी उमेदवारांनी स्थानिक अनुसूचित क्षेत्रातील आवश्यक पुरावे सादर करणे बंधन कारक राहील असे नमुद आहे.

शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळ मर्या., नाशिक यांचे आस्थापनेवरील निरिक्षक या पदाच्या भरती प्रक्रियेसाठी घेतलेल्या लेखी परिक्षेतील उमेदवारांची गुणवत्ता तसेच ऑनलाईन अर्जात नमुद केलेल्या स्थानिक अनुसूचित क्षेत्रातील पत्यानुसार कागदपत्र पडताळणीच्या अधिन पात्र टरलेल्या गुणवत्ताधारक उमेदवारांची अंतरिम निवड यादी व अंतरिम प्रतिक्षा यादी www.shabriexam.com या संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यांत आली आहे.

निरिक्षक या पदाकरीता ऑनलाईन अर्ज केलेल्या उमेदवारांनी दाखल केलेल्या निवेदनांवरील उमेदवारांनी फॉर्म भरतांना स्थानिक अनुसूचित क्षेत्रातील मुळ पत्ता नमुद न करता पत्र व्यवहारासाठी अन्य पत्ता नमुद केलेला असल्याने सदर उमेदवार हे स्थानिक अनुसूचित क्षेत्रातील (पेसा अंतर्गत) असुन सुद्धा अंतरिम निवड यादी मध्ये त्यांचा समावेश झालेला नाही.

मा.राज्यपाल महोदय, यांचे दिनांक ९ जुन, २०१४ च्या अधिसुचना व सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्र.बीबीबसी-२०१४/प्र.क्र.२१३A/१४/१६ब मंत्रालय मुंबई - ३२ दिनांक ५ मार्च, २०१५ नुसार अनुसूचित जमातीतील स्थानिक अनुसूचित क्षेत्रातील उमेदवारांवर अन्याय होऊ नये यासाठी खालीलप्रमाणे कार्यवाही करण्यांत येत आहे.

- निरिक्षक या पदासाठी प्रसिद्ध केलेल्या कट ऑफ गुणांच्या वरील सर्व उमेदवारांना स्थानिक अनुसूचित क्षेत्राच्या निकषात बसतात किंवा नाही ही खात्री करण्यासाठी कागदपत्र पडताळणी करीता प्राथमिक टप्यात पाचारण करण्यांत येत आहे.
- त्यानुसार मुळ कागदपत्र पडताळणी अंती जे उमेदवार हे स्थानिक अनुसूचित क्षेत्रात समावेश असल्याचे पुरावे सिद्ध करतील अशा पात्र उमेदवारांचा गुणवत्तेच्या आधारे अंतरिम निवडसाठी विचार करण्यांत येईल.
- दिनांक २ डिसेंबर, १९८५ च्या भारतीय राजपत्रानुसार उमेदवार हा स्थानिक वास्तव्याकरीता महाराष्ट्र शासन राजपत्र दिनांक ९ जुन, २०१४ अन्वये स्थानिक अनुसूचित क्षेत्रातील असल्याबाबत पुराव्या दाखल खालील कागदपत्रे सादर करतील.

    ३) उमेदवाराचा मुळ जातीचा दाखला.

    ४) उमेदवाराचे मुळ जात वैधता प्रमाणपत्र.
- सदर मुळ प्रमाणपत्राच्या आधारे दिनांक २ डिसेंबर, १९८५ च्या भारतीय राजपत्रानुसार व महाराष्ट्र शासन राजपत्र दिनांक ९ जुन, २०१४ चे अधिसुचनेनुसार उमेदवार स्थानिक अनुसूचित क्षेत्रात वास्तव्य करीत असल्याचे सिद्ध झाल्यासच उमेदवाराचा निवड प्रक्रियेच्या पुढील टप्याकरीता विचार करण्यांत येईल.

व्यवस्थापकीय संचालक
शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळ मर्या.,
नाशिक-२ करीता

स्थळ प्रत मा.व्य.सं.यांचे सहीने अनुमोदीत